महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण यांना हरीत ऊर्जा निधी कार्यकम (G.C.F.) अंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी अनुदान वितरित करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन

उद्योग, उर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१९/प्र.क्र.८७ /ऊर्जा-७.

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

तारीख: ३० मार्च, २०१९.

वाचा : (१) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग,क्र.अपाऊ-२००७/प्र.क्र.६९३/उर्जा-७, दि.१४.१०.२००८.

(२) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग,क्र.पवन-२००९/प्र.क्र.१३१८/उर्जा-७, दि.१७.०२.२००९.

(३) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग,क्र.पवन-२००९/प्र.क्र.१४६७/उर्जा-७, दि.२६.११.२००९.

(४) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग,क्र.पवन-२०१०/प्र.क्र.१३४/उर्जा-७, दि.१४.०७.२०१०.

(५) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग,क्र.अपाऊ २०१३/प्र.क्र.१२१/उर्जा-७, दि.२१.०८.२०१३.

(६) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग,क्र.अपाऊ-२०१५/प्र.क्र.४९/उर्जा-७, दि.२०.०७.२०१५.

(७) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग,क्र.अपाऊ २०१५/प्र.क्र.४९(भाग-८)उर्जा-७, दि.०९.०९. २०१५.

(८) राज्यस्तरीय पवन उर्जा प्रकल्प रस्ते दुरुस्ती समिती यांचे दि.११.०२.२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

(९) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. ०२.०४.२०१८.

(१०) महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण, यांचे पत्र क्र.बीपी/०२०/जीसीएफ/२०१८-१९/११५५, दि.२९ मार्च, २०१९.

(११) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग,क्र. बियुडी-२०१९/प्र.क्र.१०२/उर्जा-७, दि.०८.०३.२०१९.

(१२) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१९/प्र.क्र.४१/अर्थ-३, दि. ०८ मार्च, २०१९.

(१३) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दि. ०८ मार्च, २०१९.

(१४) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्र पवन-२०१८/प्र.क्र.५०१/उर्जा-७, दि.१३ मार्च, २०१९

प्रस्तावना -:

राज्यातील पवन उर्जा प्रकल्पाच्या अवजड यंत्रसामुग्रीमुळे नादुरुस्त झालेल्या इतर जिल्हा मार्ग (इ.जि.मा.) व ग्रामीण मार्ग (ग्रा.मा.) यांच्या दुरुस्तीकरिता लागणारा निधी संदर्भाधिन शासन निर्णय दि.२१.०८.२०१३ नुसार महाउर्जाकडे प्रकल्प विकासकांनी जमा केलेले रस्ते दुरुस्ती शुल्क तसेच शासनाकडून मिळणारा हरीत उर्जा निधी यामधून महाउर्जामार्फत सार्वजनिक बांधकाम विभागास उपलब्ध करण्यात येतो. यासंदर्भात अशा अंदाजपत्रकानुसार / हाती घेण्यात येणारी कामे राज्यस्तरीय पवन उर्जा प्रकल्प रस्ते दुरुस्ती

समितीच्या शिफारशीने शासनास प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्याबाबतची तरतूद आहे. संदर्भाधिन क्र.११ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेले रुपये ३६.६७०६९५५ कोटी मान्य खर्चाचे व माण तालुक्यातील महाउर्जा नियामक मंडळाने मान्यता दिलेले रुपये २.३७०३९८१ कोटी खर्चाच्या अंदाजपत्रकीय किंमतीचे ३ रस्ते असे एकूण रुपये ३९.०४१०९३६ कोटी इतका खर्च १९ रस्त्यांसाठी होणार असून त्यापैकी रुपये २०.७०५७ कोटी तरतूद पवन ऊर्जा विकासकांनी जमा केलेले रस्ते दुरुस्ती शुल्कापैकी महाऊर्जाकडे शिल्लक असलेला निधी वापरण्यात येणार आहे. उर्वरित रुपये १८.३३५३९३६ कोटीचा प्रस्ताव व सहवीज निर्मिती प्रकल्पांतर्गत निष्कासन व्यवस्थेचा परतावा प्रकरणी रुपये ०.६५९९५ कोटी असे एकूण मिळून रुपये १८.९९५३४३६ कोटी रक्कम होत आहे. त्यानुषंगाने रुपये १८.९९५३ कोटी निधीची केलेली मागणी विचारात घेऊन सदर निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय - :

राज्यातील पवन उर्जा प्रकल्पाच्या अवजड यंत्रसामुग्रीमुळे नादुरुस्त झालेल्या सातारा जिल्हयातील पाटण तालुक्यातील १० रस्ते, जावळी तालुक्यातील ३ रस्ते, कोरेगाव तालुक्यातील ३ रस्ते व माण तालुक्यातील ३ रस्ते अशा एकूण १९ रस्त्यांच्या दुरुस्ती करिता सोबतच्या विवरणपत्रातील कामनिहाय दर्शविल्याप्रमाणे एकूण रुपये ३९.०४१०९३६ कोटी रक्कमेपैकी रुपये २०.७०५७ कोटी तरतूद पवन ऊर्जा विकासकांनी जमा केलेले रस्ते दुरुस्ती शुल्कापैकी महाऊर्जाकडे शिल्लक निधी वजा करुन उर्वरित रुपये १८.३३५३५ कोटी व सहवीज निर्मिती प्रकल्पांतर्गत निष्कासन व्यवस्थेचा परतावा प्रकरणी रुपये ०.६५९९५ कोटी असे एकूण मिळून रुपये १८.९९५३ कोटी (रुपये आठरा कोटी नव्याण्णव लक्ष त्रेपन्न हजार फक्त) इतके अनुदान महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांना वितरित करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर रक्कम अदा करण्यासाठी श्री. उ. द. वाळुंज, सह सचिव (ऊर्जा), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी व श्री. ना. रा. ढाणे, अवर सचिव, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर निधी महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे (Director General, Maharashtra Energy Development Agency, Pune) यांच्या नावे अदा करण्यात यावा.

४. हरीत ऊर्जा निधी कार्यकम अंतर्गत विविध योजनेवरील खर्चाचा, उद्दिष्टे व प्रत्यक्ष साध्यता याबाबतच्या माहितीसह मासिक व त्रैमासिक अहवाल लगतच्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत सादर करण्यात यावा. सदर अहवाल सादर करण्याची जबाबदारी लेखाविषयक बाबी हाताळणाऱ्या सहाय्यक संचालक (लेखा) म्हणून कार्यभार पहाणाऱ्या अधिकाऱ्यावर टाकण्यात यावी.

५. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या निधीची रक्कम केवळ हरीत ऊर्जा निधी कार्यकम (G.C.F.) अंतर्गत विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी खर्च करण्यात येईल याची खातरजमा करण्यात यावी. ज्या रस्त्यांना राज्य शासनाच्या रस्ते दुरुस्ती समितीने मान्यता दिली आहे, केवळ त्याच रस्त्यांना निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. सहवीजनिर्मिती प्रकल्पांतर्गत निष्कासन व्यवस्थेस निधी संबधीत शासन निर्णयात नमूद मर्यादेच्या अनुज्ञेयतेपुढे जात नाही याची याची खात्री महासंचालक, महाउर्जा यांनी करुन निधी वितरणाची कार्यवाही करावी. निधी ज्या कामाकरिता उपलब्ध केला आहे, त्याच कामावर खर्च होईल याची खात्री करण्यात यावी. त्यात बचत होत असल्यास ती बाब शासनाच्या निदर्शनास आणून त्याबाबत विविक्षित

आदेश घेण्यात यावेत. शासन निर्णयातील नमूद रस्त्यांच्या मंजूर कामासाठी शासनाच्या इतर कोणत्याही स्त्रोतांमधून निधी उपलध करु घेता येणार नाही, तसेच यापुर्वी निधी उपलब्ध झाला असलेली कामे घेता येणार नाहीत.

६. सदर निधीच्या लेख्यासंबंधीची कागदपत्रे, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाने आवश्यक तेव्हा महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई यांच्याकडे तपासणीसाठी सादर करावीत.

७. याबाबतचा खर्च "मागणी क्रमांक-के-६, २८१०, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, ६०, इतर,८००, इतर खर्च (००)(०५) महाराष्ट्र ऊर्जा विकास निधीमधून भागविलेला खर्च (कार्यक्रम), ५० इतर खर्च (२८१००१२३)" या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

८. हरीत ऊर्जा निधी कार्यकम (G.C.F.) अंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण यांना निधी वितरीत करतांना महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१८ शासन परिपत्रक वित्त विभाग, क्रमांक: अर्थसं-२०१८ /प्र.क्र.६९ / अर्थ-३, दि. ०२ एप्रिल, २०१८ च्या परिशिष्टातील तपासणी सूचीमधील अ.क्र. ३ व ९ येथील अटींची व या परिपत्रकातील परिच्छेद क्र.७ मधील प्रत्येक अटीची पूर्तता होत असून, शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २५ जानेवारी, २०१९ मधील सूचनांनुसार विभागाला प्राप्त अधिकारात सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३३०१५०२१५२५१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Nanasaheb Rajaram Dhane
Date: 2019.03.30 15:06:51 +05'30'

(ना. रा. ढाणे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे म्हाडा कमर्शियल कॉम्प्लेक्स, सर्व्हे नं. १९१-ए- फेज, येरवडा, पुणे- ४११ ००६.
२. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा), मुंबई- ४०० ००१
३. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), नागपूर
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७. अवर सचिव (रोख/प्रशासन), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई.३२
८. अवर सचिव (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९. निवड नस्ती, ऊर्जा-७.

शासन निर्णय क्रमांक : बियुडी-२०१९/प्र.क्र.८७/उर्जा-७, दिनांक- ३०.०३.२०१९ सोबतचे सहपत्र

तांत्रिक मान्यता (T.S) प्राप्त

अ) सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा, जि, सातारा.

अ.क्र.	कामाचे नांव	अंदाजपत्रकीय किंमत (रुपये)
अ-तालुका पाटण		
१	कोकिसरे नवलाईवाडी ते गवळीनगर रस्ता कि.मी.०/०० ते ४/८०० ची दुरुस्ती करणे. ता.पाटण जि, सातारा	३,७०,९९,५९४
२	वेताळवस्ती काळगाव ते मस्करवाडी रस्ता ग्रा.मा.३६१ कि.मी.०/०० ते१/५०० ची दुरूसती करणे ता.पाटण जि.सातारा	१,३२,८८,४३०
३	माईगडेवाडी गणेशवाडी हौदाचीवाडी म्हाळूंगेवाडी ते सातारा रस्ता कि.मी.०/०० ते ८/५०० ची दुरूस्ती करणे ता.पाटण जि.सातारा	४,९९,९०,९००
४	भोसगाव आंब्रुळकरवाडी ते कोळेकरवाडी रस्ता कि.मी.०/०० ते ७/०० ची दुरुस्ती करणे. ता.पाटण जि.सातारा	३,८५,६२,३१०
५	कोळेकरवाडी अनुतेवाडी ते कारळे रस्ता कि.मी. ०/०० ते ८/०० ची दुरूस्ती करणे. ता.पाटण जि.सातारा	३,९८,८२,७७०
६	नेरळे ते गुंजाळी रस्ता ग्रा.मा.१८८ कि.मी. ०/०० ते ३/०० ची दुरूस्ती करणे.	१,११,९३,१८३
७	घेरादातेगड गावपाहोच रस्ता ग्रा.मा. ९३ कि.मी. ०/०० ते ३/०० ची दुरूस्ती करणे.	२,०७,५८,३०२
८	गावडेवाडी फाटा ते धुईलवाडी रस्ता ग्रा.मा. ६३ कि.मी. ०/०० ते ३/०० ची दुरुस्ती करणे.	१,५८,४५,९७९
९	काठीटेक ते अवसरी रस्ता ग्रा.मा.५५ कि.मी. ०/०० ते ३/५०० ची दुरूस्ती करणे	१,६२,७९,९११
१०	रामेल फाटा ते रामेल रस्ता ग्रा.मा.५२ कि.मी.०/०० ते ३/००	७९,९५,२७६
	एकूण (अ)	२५,०८,९६,६५५
ब - तालुका कोरेगाव		
१.	दुधानवाडी देऊर बिचुकले नलवडेवाडी रस्ता इजिमा-२३ कि.मी. ०/०० ते १२/०० ची दुरूस्ती करणे. ता.कोरेगाव, जि.सातारा	३०,२३,९०००
२.	अंबवडे गुजरवाडी बिचकुळे तळीये ते रा.मा. १३९ रस्ता इजिमा-७२ कि.मी. ०/०० ते ११/०० ची दुरूस्ती करणे. ता.कोरेगाव, जि.सातारा	३२,२५,९०००
३.	किन्हई बैदेवस्ती जोडरस्ता ग्रा.मा. -४६ कि.मी. ०/०० ते ३/०० रस्ता दुरूस्ती करणे. ता.कोरेगाव, जि.सातारा	७५,५१,०००
	एकूण (ब)	७,००,४९,०००
क -तालुका जावळी		
१.	राजमार्ग ते पाठणे मार्ची रस्ता ग्रा.मा. १०८ कि.मी. ०/०० ते १/५०० चे खडीकरण व डांबरीकरण करणे. ता. जावळी, जि.सातारा	८९,९२,४००
२.	राजमार्ग ते म्हाते मुरा रस्ता ग्रा.मा. १०६ कि.मी. ०/०० ते २/७०० चे खडीकरण व डांबरीकरण करणे.	१,४८,४७,४००
३.	राजमार्ग ते मान्टी ते तेटली मुरा ते आपटीमुरा रस्ता ग्रा.मा. ११९ कि.मी. ०/०० ते ४/०० रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.	२,१९,२१,५००
	एकूण (क)	**४,५७,६१,३००**
	एकूण (अ+ब+क)	**३६,६७,०६,९५५**

ब) नियामक मंडळाच्या ९४ व्या बैठकीतील तांत्रिक मंजुरी प्राप्त अंदाजपत्रकानुसार

अ.क्र.	कामाचे नांव	अंदाजपत्रकीय किंमत (रुपये)
	अधिक्षक अभियंता, सा.बा. विभाग, सातारा यांनी सादर केलेला प्रस्ताव	
	ता. माण	
१	कुळजाई गणेशखिंड ते बोथे रस्ता ग्रा.मा. ५६ कि.मी. ०/०० ते २/०० ची सुधारणा करणे. ता. माण, जि. सातारा (पवनऊर्जा अंतर्गत)	७९,०९,५३६
२	कळसकरवाडी ते श्रीपालवन ते गरडाचीवाडी रस्ता ग्रा.मा. ४३ कि.मी. २/७८२ ते ४/७६७ ची सुधारणा करणे, ता. माण, जि. सातारा. (पवनऊर्जा अंतर्गत)	९५,१९,५५०
३	कुळजाई ते बोथे रस्ता ग्रा.मा. ५६ कि.मी. २/०० ते ४/०० ची सुधारणा करणे. ता. माण. जि. सातारा. (पवनऊर्जा अंतर्गत)	६२,७४,८९५
	एकूण	**२,३७,०३,९८१**
	एकूण अ व ब (रुपयात)	**३९,०४,१०,९३६**
	पवन ऊर्जा विकासकांनी जमा केलेले रस्ते दुरुस्ती शुल्कापैकी महाऊर्जाकडे शिल्लक असलेला निधी	२०,७०,५७,०००
	(क्ष) हरित ऊर्जा निधी अंतर्गत वितरीत करावयाचा निधी	**१८,३३,५३,९३६**

(क) सहवीज निर्मिती प्रकल्पांतर्गत निष्कासन व्यवस्थेचा परतावा - रु. ६५,९९,५००

मे. लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि., (माजलगांव) मौजे सुंदरनगर, तेलगांव, ता. धारुर, जि. बीड येथील २२ मे.वॅ. क्षमतेच्या सह-वीज निर्मिती प्रकल्पास उर्वरित निधी रक्कम रु. ६५,९९,५००

अ. क्र.	प्रकल्पाचे नांव	प्रकल्पाची क्षमता	निष्कासन व्यवस्था खर्च (रुपयात)	भांडवली अनुदान	एकूण
१	मे. लोकनेते सुदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि. (माजलगांव), मौजे. सुंदरनगर, तेलगाव, ता. धारुर, जि. बीड	२२	६५,९९,५००	०.००	६५,९९,५००

वरील (क्ष) तक्त्यातील रुपये १८,३३,५३,५०० व (क) तक्त्यातील रुपये ६५,९९,५०० असे एकूण रुपये १८,९९,५३,००/- मिळून रुपये १८.९९५३ कोटी (रुपये आठरा कोटी नव्याण्णव लक्ष त्रेपन्न हजार फक्त).